# यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., यवतमाळ.

स्थापना - 1962
बँकींग परवाना क्र. आर.पी.सी.डी. नाग./डीसीसीबी/एल/12 दि. 05.03.12.
मुख्य कार्यालय, यवतमाळ - 445001.
E-mail ID:- ydccbank1@gmail.com, ydccbank2@rediffmail.com

Fax No . 07232 - 242182
STD : 07232
242180,242181, 242182


जा.क्र.वसुली विभाग/५९/२०१९-२०/ दिनांक :

## मालमत्ता विक्रीची निवीदा

वित्तीय मालमत्तेच्या सुरेक्षीतीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी कायदा २००२ अंतर्गत (नियम ८ व ९ नुसार)

ज्या अर्थी खालील हस्ताक्षर कर्त्यांनी यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक, यवतमाळचे प्राधिकृत अधिकारी असण्याच्या क्षमतेत दि.०१.०१.२०१९ ला वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षीतीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी कायदा २००२ च्या कलम १३ (२) च्या अन्वये बॅकेच्या ऋण वसुलीकरीता कर्जदार संस्था यवतमाळ जिल्हा परिषद सहकारी पत संस्था मर्या, यवतमाळ मुख्यालय दारव्हा र.नं. १०४४ (कर्जदार व गहाणदार) यांना कर्जमागणी नोटीस पाठविण्यात आली होती. उपरोक्त उल्लेखीत कर्जदाराने त्या नोटीस प्रमाणे देय रक्कमेची परतफ़ेड विहीत कालावधीत न केल्याने तदनंतर त्या अनुषंगाने गहाणदार यवतमाळ जिल्हा परिषद सहकारी पत संस्था मर्या, यवतमाळ मुख्यालय दारव्हा र.नं. १०४४ रा. दारव्हा जि. यवतमाळ यांच्या निम्नलिखीत मालमत्तेचा दि.२८.०३.२०१९ ला संस्थेच्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा सुद्धा घेतला आहे. उपरोक्त उल्लेखीत कर्जदाराने त्या नोटीस प्रमाणे देय रक्कमेची परतफ़ेड विहीत कालावधीत न केल्याने विक्री करण्याकरीता खालील उल्लेखीत स्थावर मालमत्तेची अटी व शर्थीवर मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| कर्जदार व गहाणदाराचे नाव | यवतमाळ जि.प. शिक्षक सह. पत संस्था म. यवतमाळ मुख्यालय दारव्हा र.नं. १०४४ |
| स्थावर मालमत्तेचे वर्णन | संस्थेचे मौजे दारव्हा ता.दारव्हा जि.यवतमाळ येथील भुमापन क्र.१४२/७ ब क्षेत्रफ़ळ ०.३९ हे. व त्यावरील बांधकाम क्षेत्र कार्यालय ४२९.६० चौ.मी. चौकीदार खोली ३२.६३ चौ.मी. चर्तुसिमा पुर्वेस - भुमापन क्र.१४२/७ पश्चिमेस - यवतमाळ पुसद रस्ता उत्तरेस - रस्ता दक्षिणेस - हिंगासपुरे ले-आऊट |
| मालमत्तेचे मुल्यांकण | १,५८,००,०००/- (अक्षरी रुपये **एक कोटी अठ्ठावन्न लाख**) |
| कर्जदाराचे बॅक प्रती देय असलेली रक्कम | मुद्दल रु.१६,३५,०५,४४२/- दि.३१.१२.२०१८ पर्यंत व्याज रु.११,८५,६४,९२६/- एकुण रु.२८,२०,७०,३६८/- व पुढील होणारे व्याज |

निविदा सादर करण्याची अंतीम तारीख दि.१५.०६.२०१९
वेळ दु. ३.०० वा. पर्यंत, स्थळ :- प्राधिकृत अधिकारी, वसुली विभाग, मुख्य कार्यालय, यवतमाळ
या संबंधीची विस्तृत माहिती बॅकेच्या www.ydccbank.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

## अटी व शर्थी

१) निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी दि.१५.०६.२०१९ पर्यंत रु.५०००००/- अनामत रक्कमेचा डी.डी. स्वतंत्र लिफ़ाफ़्यात **"यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक मर्या, शाखा यवतमाळ"** या नावाने सादर करावा.

२) मालमत्ता हस्तांतरणाचे अनुषंगाने येणारा सर्व खर्च खरेदीदारास करावा लागेल.

३) विक्रीबाबत प्रक्रीया पुढे चालु ठेवणे, प्रक्रीया कारणाविना / कारणासह रद्द करणे, विक्री अंतीम करणे बाबत हक्क बॅक राखुन ठेवीत आहे. यासाठी कोणतेही कारण,विवरण दिले जाणार नाही.

४) निविदा मंजुर झाल्यानंतर / मंजुर झाल्याचे निविदा धारकास कळविल्यानंतर त्वरीत म्हणजे ३ दिवसांचे आत मंजुर निविदा रक्कमेच्या २५% रक्कम भरणा करावी लागेल.

५) उर्वरीत रक्कम तीस दिवसाचे आत भरणा करावी लागेल.

६) मुदतीत रक्कमेचा भरणा न केल्यास अनामत रक्कम तसेच मंजुर निविदा रक्कमेच्या शेकडा २५% भरणा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल.

७) विक्री मुल्य (रिझर्व्ह प्राईस) पेक्षा कमी रक्कमेची निविदा प्राप्त झाल्यास बॅकेच्या संचालक मंडळापुढे ठेवुनच निर्णय घेण्यात येईल व झालेला निर्णय निविदाधारकास बंधनकारक राहील.

८) निविदा विहित नमुन्यात सादर करावी लागेल विहित नमुना वेबसाईट वरुन डाऊनलोड करावा. किंवा वसुली विभाग य.जि.म.स.बॅक मुख्य कार्यालय,यवतमाळ किंवा विभागीय कार्यालय दारव्हा येथुन प्राप्त होऊ शकेल.

९) संस्थेची स्थावर मालमत्ता पाहणी करता येईल. या शिवाय इतर अटी व शर्थी बॅकेच्या मुख्य कार्यालयात वसुली विभाग येथे उपलब्ध आहे व इतर माहिती आवश्यक असल्यास प्राधिकृत अधिका-याशी संपर्क शाधावा.

व्ही.एन.तंबाखे
प्राधिकृत अधिकारी
य.जि.म.स.बॅक मर्या.,
वसुली विभाग, मु.का. यवतमाळ
मो.नं. ७५८८०४२५३०